## अपर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी)

## विभागातील महसूल उप विभागांतर्गत खालील नमूद कायद्यांची अंमलबजावणी/पर्यवेक्षण/सनियंत्रण केले जाते.

- महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम,१९६६.
- मुंबई कुळवहिवाट व शेत जमीन अधिनियम, १९४८.
- मुंबई कुळवहिवाट व शेत जमीन (विदर्भ विभाग) अधिनियम, १९५८.
- हैद्राबाद कुळवहिवाट व शेत जमीन अधिनियम, १९५०.
- मुंबई विश्वस्त अधिनियम, १९५०.
- महाराष्ट्र अनुसूचित जमातीचा जमिनी प्रत्यार्पित करणे अधिनियम, १९७४.
- इनाम/ वतनविषयक कायदे
- हैद्राबाद इनाम व कॅश ग्रॅन्टस अधिनियम, १९५४.
- नांदेड शिख गुरुद्वारा सचखंड श्रीहूजूर अपचलनगर साहीब अधिनियम, १९५६.
- महाराष्ट्र शेत जमिन (जमीन धारणेची कमाल मर्यादा), अधिनियम, १९६१.
- गौण खनिजाच्या कार्याचे नियमन करण्याबाबतचा नियम, १९५४.
- मुंबई गौण खनिज उत्खनन नियम, १९५५.
- महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम, १९२३.
- महाराष्ट्र जाहिरात कर अधिनियम, १९६७.
- महाराष्ट्र पैजकर कायदा, १९२५.
- अतियात इन्क्वायरीज कायदा, १९५२.

## विभागातील मुद्रांक शुल्क व नोंदणी प्रभागांतर्गत खालील नमूद कायद्यांची अंमलबजावणी/पर्यवेक्षण/सनियंत्रण केले जाते.

- भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९ व त्याखालील नियम.
- महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ व त्याखालील नियम.
- नोंदणी अधिनियम, १९०८ व त्याखालील नियम.
- मुंबई विवाह अधिनियम, १९५३ .
- महाराष्ट्र कोर्ट फी अधिनियम, १९५९.

************

## प्रधान सचिव (वने)

### विभागातील वन उप विभागांतर्गत खालील नमूद कायद्यांची अंमलबजावणी/पर्यवेक्षण/सनियंत्रण केले जाते.

- ❑ भारतीय वन अधिनियम, १९२७
- ❑ वने (संवर्धन) कायदा, १९८०
- ❑ वन्य जीव (संरक्षण) कायदा, १९७२
- ❑ जैविक विविधता कायदा, २००२
- ❑ महाराष्ट्र वनोत्पादन (व्यापाराचे विनियमन) अधिनियम, १९६९
- ❑ महाराष्ट्र वृक्ष तोड नियम, १९६४
- ❑ महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५
- ❑ महाराष्ट्र अनुसूचित जमातींच्या भोगवटदारांनी झाडांची विक्री करणे (नियमन) अधिनियम, १९६९.

### विभागातील भूसंपादन प्रभागांतर्गत खालील नमूद कायद्यांची अंमलबजावणी/पर्यवेक्षण/सनियंत्रण केले जाते.

- ➢ भूसंपादन अधिनियम, १९८४
- ➢ भूसंपादन (कंपनी) नियम, १९६३ खाली भूसंपादन समितीचे गठण/ पुर्नरचना करणे, समितीच्या बैठका घेणे व तिचे कामकाज पाहणे.
- ➢ भूसंपादनाशी संबंधित सर्व बाबी (न्यायालयीन प्रकरणांसह)
- ➢ स्थावर मालमत्ता अधिग्रहण व संपादित जमिनी अधिनियम, १९५२ नुसार स्थावर मालमत्ता अधिग्रहण व भूसंपादनाची सर्व कामे व लवादाची नेमणूक, इ.
- ➢ भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

***********

## सचिव (मदत व पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन)

### विभागातील मदत प्रभागांतर्गत खालील प्रमाणे घेण्यात येणारे धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी/पर्यवेक्षण /सनियंत्रण केले जाते.

- अतिवृष्टी, पूर व दुष्काळ इ. सारख्या नैसर्गिक आपत्ती अंतर्गत आपतग्रस्तांना द्यावयाच्या मदतीचे निकष निश्चित करणे.
- टंचाई संहितेचे पुनर्विलोकन करणे.
- टंचाई निवारक कामे, आणेवारी ठरविणे.
- टंचाई निवारण कामासाठी जीप व इतर वाहने अधिग्रहीत करणे.
- प्रशासकीय गरजेनुसार व इतर परिस्थितीत उद्भवलेली कामे.
- अकृषिक/ कृषी कर्जे अधिनियम अंतर्गत कार्यवाही, इ.

### विभागातील पुनर्वसन प्रभागांतर्गत खालील प्रमाणे घेण्यात येणारे धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी/पर्यवेक्षण /सनियंत्रण केले जाते.

- प्रकल्पबाधीत व्यक्तींच्या पुनर्वसनासंबंधी धोरणात्मक बाबी.
- महाराष्ट्र प्रकल्पबाधीत व्यक्तींचे पुनर्वसन अधियम, १९८६
- पुनर्वसन कक्षाशी संबंधित तक्रार निवारण
- राज्यातील पुनर्वसनाचे प्रश्न
- सरदार सरोवर प्रकल्पग्रस्तांचे व कोयना धरणग्रस्तांचे पुनर्वसन व त्यानुषंगिक येणारी इतर सर्व कामे.
- पश्चिम पाकिस्तानातून आलेल्या निर्वासितांचे पुनर्वसन.
- पूरग्रस्त व पुराचा धोका असणा-यांचे पुनर्वसन (सुरक्षित ठिकाणी भूखंड उपलब्ध करुन देणे)
- संपूर्ण राज्यातील मुक्त वेठबिगारांचे पुनर्वसन, इ.

### विभागातील आपत्ती व्यवस्थापन प्रभागांतर्गत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात येते.

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ व सदर अधिनियमाच्या अंतर्गत स्थापित राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (SDMA) मार्फत राज्यात उद्भवणा-या कोणत्याही आपत्तीचे प्रभावी व तत्पर व्यवस्थापन करण्याची कार्यवाही करण्यात येते.

आपत्ती उद्भवल्यानंतर केवळ मदत देण्याऐवजी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीनतर आपत्तीविषयक पूर्व तयारी, जनजागृती, क्षमताबांधणी, प्रशिक्षण याबाबींवर जास्त भर देण्यात येत आहे. त्यामुळे आपत्ती उदभवल्यास होणारी हाणी कमी करण्यामध्ये मदत होत आहे. आपत्तीची तीव्रता देखील काही प्रमाणात कमी झालेली आहे. जनजागृतीमुळे राज्यातील नागरिकांमध्ये आवश्यक जाणीव निर्माण करण्यात यश आलेले आहे.

### विभागातील मंत्रालय नियंत्रण कक्षामार्फत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात येते.

आपत्तीच्या वेळी सर्वसामान्य जनता व शासन यामध्ये समन्वय व आपत्ती निवारणाची महत्वाची भूमिका बजविण्यासाठी करण्यात आली आहे. याकामी आपत्तीच्या प्रसंगी घडलेल्या घटनेची वस्तुनिष्ठ माहिती आपत्तीचे व्यवस्थापन करणा-या यंत्रणेकडून सर्वसामान्य जनतेला वेळोवेळी मिळणे अपेक्षित आहे.

*********

## अपर मुख्य सचिव तथा विशेष कार्यकारी अधिकारी (अपिल व रिव्हीजन)

### विभागातील अपील व पुनरीक्षण उपविभाग कक्षामार्फत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात येते.

- शासनाकडे जमीन महसूल व तत्सम अधिनियमाखाली प्राप्त होणाऱ्या अपील/पुनरीक्षण/पुनर्विलोकन अर्जापैकी मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री (महसूल) महोदयांनी निर्देशित केलेली प्रकरणे निकाली काढणे.

***********